# गर्व आणि पूर्वग्रह (Pride and Prejudice): जेन ऑस्टिन

संक्षिप्त मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**प्रास्ताविक:**

जेन ऑस्टिन (१७७५-१८१७) हिने फक्त ६ कादंबऱ्या लिहिल्या आणि त्यातही Pride and Prejudice ही तिची सर्वात जगप्रसिद्ध masterpiece - उत्कृष्ट कलाकृती - मानली जाते. या कादंबरीत समकालीन मध्यमवर्गाचे इतके रेखीव चित्रण केले आहे की साहित्यिकांनी आणि टीकाकारांनी एक श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून तिला गौरविले आहे. तिचा समकालीन कादंबरीकार Sir Walter Scott याने तिची प्रशंसा करताना म्हटले आहे, "जरी खेडेगावातील मध्यमवर्गापुरता तिचा आवाका मर्यादित असला तरी तिचे चित्रण दोन इंच हस्तिदंताच्या पट्टीवरील कोरीव कामासारखे रेखीव आहे." हर्टफर्डशायर या छोट्या गावातील तीन-चार कुटुंबांपुरते तिचे मध्यमवर्गीय जीवन आहे. फारसे संघर्ष नाहीत. पण तरीही ओघवती भाषा, रेखीव चरित्रचित्रण, व बंदिस्त कथानक या जोरावर तिने अमाप कीर्ती मिळवली आहे. Pride and Prejudice ही महाविद्यालयीन अभ्यासक्रमात कुठल्या ना कुठल्यातरी वर्षाला हमखास असते.

**प्रमुख पात्रे:**

| | |
|---|---|
| १) श्री बेनेट: | थोडीफार मालकीची जमीन असलेले कनिष्ठ मध्यमवर्गीय गृहस्थ. ५ मुलींचे पण मुलगा नसलेले पिताजी. दोन नंबरची मुलगी एलिझाबेथ लाडकी. संसारात फारसे लक्ष न देणारा, विनोदबुद्धी असलेला पती. |
| २) सौ. बेनेट: | एक मूर्ख, तारतम्य / सारासार विचार नसलेली, मुलींच्या लग्नाची सतत चिंता करणारी स्त्री, आई. |
| ३) जेन: | बेनेट दांपत्याची ज्येष्ठ कन्या - सुंदर, शांत, सुस्वभावी. |
| ४) एलिझाबेथ: | जेनसारखी सुंदर नाही, पण पाणिदार, हुशार, बुद्धिमान, स्मार्ट, आकर्षक. कन्या नं २. कादंबरीची नायिका. एखादा ग्रह करून घेतल्यानंतर सहसा न सोडणारी. शीर्षकातील पूर्वग्रह (prejudice) या शब्दाची प्रतिनिधी. |
| ५) मेरी व कॅथरीन: | ३ व ४ नंबरच्या कन्या. |
| ६) लिडीया: | सर्वात धाकटी, उच्छृंखल कन्या. लष्करी अधिकाऱ्यांची भोक्ती. १५ व्या वर्षीच विकहॅम या आकर्षक अधिकाऱ्याबरोबर पळून जाते. डार्सीच्या मध्यस्थीमुळे तिचा त्याच्याशी विवाह होतो व कुटुंबाची बदनामी टळते. |
| ७) विल्यम डार्सी: | देखणा, श्रीमंत जमीनदार. उच्चकुलीन पण गर्विष्ठ. शीर्षकातील गर्व (pride) या गुणाचा प्रतिनिधी. कादंबरीचा नायक. |
| ८) चार्ल्स बिंग्ले: | श्रीमंत, सुस्वभावी जमीनदार. जेनकडे प्रथमभेटीत आकर्षित होतो. पण बहिणी व डार्सी यांच्या प्रभावामुळे प्रेमाची प्रगती मंदावते. |
| ९) कॅरोलिन बिंग्ले: | चार्ल्सची बहीण, डार्सीशी विवाह करू इच्छिणारी असल्याने जेन व एलिझाबेथ यांची शत्रू. |

१०) विकहॅमः लष्करी अधिकारी - आकर्षक, गोडबोल्या. एलिझाबेथ सुरूवातीस त्याच्याकडे आकर्षित होते. त्याचे खरे स्वरूप डार्सीच्या पत्रावरून तिला कळते.

११) कॉलिन्सः श्री. बेनेटचा दूरचा नातेवाईक. मुलगा नसल्याने त्यांच्या मालमत्तेचा वारस. मूर्ख, अहंकारी, धर्मोपदेशक, बडेजाव करणारा. त्याच्या मालकीणबाई लेडी कॅथरीन डी बर्ग यांच्या ताटाखालचे मांजर. एलिझाबेथला लग्नाची मागणी घालतो, पण ती नाकारते. एक विनोदी पात्र.

१२) लेडी कॅथरीन डी बर्गः अहंकारी, मानभावी स्त्री. डार्सीची आत्या. त्याच्याशी आपल्या मुलीचा विवाह करण्याचा प्रयत्न करणारी.

१३) शार्लट ल्युकसः एलिझाबेथची मैत्रीण. सामान्य रूपाची व बुद्धिची.

१४) सौ. गार्डिनरः एलिझाबेथची मावशी, लंडनमधे राहाते.

**कथानकः**

लंडनपासून थोड्या अंतरावर असलेले हर्टफर्डशायर हे छोटे गाव. बेनेट कुटुंबाचे निवासस्थान. आपल्या ५ कन्यांचा विवाह हे सौ. बेनेटच्या डोक्यातील वेड असते व त्यासाठी त्या चांगल्या स्थळांच्या मागावर असतात. बरेच दिवस रिकामे असलेले हेदरफील्ड पार्क एकदाचे भाड्याने जाते, व तेथे चार्ल्स बिंग्ले नावाचा होतकरू श्रीमंत तरूण राहावयास येतो. आणि इथून कथानक सुरू होते.

पार्कमधे झालेल्या पहिल्या बॉलडान्स पार्टीमधे बेनेटची थोरली कन्या जेन व चार्ल्स एकमेकाला भेटतात व आकर्षित होतात. डान्सला चार्ल्सचा मित्र विल्यम डार्सी व चार्ल्सच्या दोघी बहिणी हजर असतात. डार्सी आपल्या गर्विष्ठपणाने सर्वांना अप्रिय होतो. तो देखणा, रूबाबदार, तरूण, चार्ल्सपेक्षा अधिक श्रीमंत असतो. डान्स करायला जोडीदार नसल्याने एका बाजूला बसलेल्या एलिझाबेथकडे निर्देश करून चार्ल्स डार्सीला तिच्याशी नाच करायला सुचवतो. गर्विष्ठ डार्सी नकार देतो. त्याचे अहंकारी उद्गार - "जिला कोणी डान्सची मागणी केली नाही तिच्याशी डान्स करायची माझी इच्छा नाही" - एलिझाबेथला दुखवून जातात. त्याचा गर्व तिचा स्वाभिमान दुखावून जातो आणि संघर्ष सुरू होतो.

अधिक परिचयानंतर डार्सीच्या लक्षात येते की एलिझाबेथ प्रथमदर्शनी सुंदर वाटत नसली तरी ती आकर्षक, बुद्धिमान, व पाणिदार आहे. नकळत तो तिच्याकडे ओढला जातो.
चार्ल्स व जेन यांचे प्रेम हळूहळू वाढत जाते. त्यांच्या भेटी वारंवार होतात. एकमेकाकडे जाणे-येणे होते. अशाच पार्कवरील एका भेटीला जाताना पावसात भिजल्यामुळे जेन आजारी पडते व तिची शुश्रुषा करायला एलिझाबेथ पार्कवर येते. ३ मैलांचे अंतर मातीतून चालत आल्यामुळे तिचा चेहरा धुळीने माखला जातो, हातपाय मातीने भरतात. तिचा तो अवतार पाहून चार्ल्सच्या बहिणी तिची पाठीमागे चेष्टा करतात. पण तिचे निरोगी सौंदर्य व बहिणीवरील प्रेम पाहून डार्सीला ती आवडू लागते. हिरवळीवर तिच्याशी गप्पा मारण्याची संधी तो चुकवत नाही. आणि नंतरच्या एका डान्सला

तो तिच्याशी नाचायची मागणी करतो. पण ती त्याचे पूर्वीचे अहंकारी उद्‌गार विसरलेली नसते. ती स्पष्ट नकार देते.

ह्याच सुमारास श्री. बेनेटचा दूरचा नातेवाईक व त्यांना मुलगा नसल्याने त्यांचा वारस असलेला कॉलिन्स त्यांना भेटायला येतो. तो धर्मोपदेशक असतो. त्याच्या मालकीणबाई लेडी कॅथरीन डी बर्ग यांच्या आज्ञेनुसार तो लग्नाच्या मोहीमेवर निघालेला असतो. बेनेटच्या मुलीशी लग्न केल्यास त्यांची आर्थिक चिंता नाहीशी होईल या उघड हेतूने तो एलिझाबेथला लग्नाची मागणी घालतो. ती त्याला तत्काळ नकार देते. तो लगेच तिच्या मैत्रीणीला - शार्लट लुकसला - मागणी घलतो. लग्नाचे वय उलटून गेलेली, सुमार रूपाची शार्लट लगेच होकार देते. कॉलिन्स असतानाच शेजारच्या मेरीटन नावाच्या शहरी लष्करी अधिकाऱ्यांची एक पलटण मुक्कामाला येते. श्री. बेनेटच्या धाकट्या मुलींना लष्करी अधिकाऱ्यांचे फार वेड. त्यामुळे त्यांच्या तिकडे फेऱ्या सुरू झाल्या. या अधिकाऱ्यांमधे विकहॅम नावाचा एक आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा, तरूण पोरींना भुरळ पाडणारा तरूण ऑफीसर होता. एक-दोन भेटीत एलिझाबेथही त्याची चाहती होते. एका भेटीत तो तिला डार्सीने आपल्यावर केलेल्या अन्यायाची कहाणी सांगतो. 'लहानपणापासून डार्सीच्या वडिलांनी त्याला वाढवले असते. मरताना त्याच्या नावाने बरीचशी रक्कम त्यांनी ठेवलेली असते. पण डार्सीने एक छदामही त्याला मिळू दिलेला नसतो.' एलिझाबेथचे मन आधीच डार्सीबद्दल कलुषित असल्याने तिला हे सगळे लगेच खरे वाटते. विकहॅमबद्दल तिला सहानुभूती वाटते व डार्सीबद्दलचा राग आणखी वाढतो.

उन्हाळा संपताच बिंग्ले मंडळी पार्क सोडून लंडनला जातात. कॅरोलिन जेनला लिहिलेल्या पत्रात प्रेमाचे मोठे प्रदर्शन करते. पण हिवाळ्यात पार्कला परत येणार नसल्याचे सूचित करते. दुसऱ्या एका पत्रात चार्ल्सचा विवाह डार्सीच्या धाकट्या बहिणीशी होण्याची शक्यताही ती सूचित करते. या पत्राने जेन दुःखी होते. तिचे चार्ल्सवर प्रेम असते, व त्याचेही आपल्यावर प्रेम असावे असे तिला वाटत असते. पण हे पत्र वाचल्यावर आपला गैरसमज झाला असे वाटून ती खूप निराश होते. पण एलिझाबेथ तिची समजूत काढते. तिला चार्ल्सच्या जेनवरील प्रेमाची खात्री असते. या सर्वाच्या पाठीमागे कॅरोलिन व डार्सी असले पाहिजेत अशी तिला दाट शंका येते.

नाताळमधे सौ. बेनेटची बहीण सौ. गार्डिनर सर्वांना भेटायला येतात. लंडनला परत जाताना त्या जेनला आपल्याबरोबर घेऊन जातात. एलिझाबेथ लंडनमधे चार्ल्स बिंग्लेची जेनशी भेट होईल अशा अपेक्षेने जेनला मुद्दाम पाठवते. काही दिवसांनी कॉलीन्स-शार्लटचे एलिझाबेथला कॉलीन्सच्या घरी येण्याचे आग्रहाचे निमंत्रण येथे. एलिझाबेथ शार्लटच्या आईवडिलांच्या बरोबर जाते. तिच्या केंट परगण्यातील गावी जाताना मधे त्या लंडनला थांबतात. मावशीला जेन भेटते. जेनला बिंग्ले बहीण एकदा भेटली असते. पण चार्ल्सने जेनच्या लंडनमधील आगमनाची जराही दखल घेतलेली नसते. डार्सी व कॅरोलिन यांनी त्याला तिच्या येण्याची बातमी दिली नव्हती, अशी एलिझाबेथची खात्री पटते.

केंटला शार्लटच्या घरी तिचे अगत्याने स्वागत होते. दुसऱ्या दिवशी कॉलिन्सच्या मालकीणबाई लेडी कॅथरीन स्वतः येऊन जेवणाचे आमंत्रण देतात. लेडी कॅथरीन या डार्सीच्या आत्या असतात व डार्सीने आपल्या मुलीशी लग्न करावे अशी त्यांची खटपट असते.

थोड्या दिवसांनी आत्याला भेटायला डार्सी येतो. एलिझाबेथ आली आहे हे कळताच तो तिला भेटायला येत राहतो. त्याचा अहंकार तिळमात्र कमी झालेला नसतो. तो त्याच गर्विष्ठ टोनमधे तिच्याशी बोलत राहतो. आणि एके दिवशी ...

अहंकारी सुरात आणि तिच्यावर उपकार करीत असल्याच्या शब्दात ती तो चक्क तिला लग्नाची मागणी घलतो. ती चकित होते व चिडतेही, व तत्काळ स्पष्ट शब्दात नकार देते. आता चकित होण्याची व चिडण्याची त्याच्यावर पाळी येते. त्याच्या सारख्या उच्चकुलीन श्रीमंताने मागणी घातल्यावर कोणतीही तरूणी आनंदाने ताबडतोब स्वीकार करील अशी त्याची अपेक्षा होती. तिचा स्पष्ट नकार ऐकून त्याला धक्काच बसला. त्याने चिडून तिला नकाराचे कारण विचारले. तिने दोन कारणे दिली - जेन व चार्ल्स यांचे एकमेकावर प्रेम असताना त्यांना दूर ठेवणे. व विकहॅमवर केलेला अन्याय. तो संतापून तिथून निघून जातो, पण दुसऱ्या दिवशी तिला भेटून तिच्या हातात एक पत्र देतो. त्यात त्याने आपल्यावरील आरोपांचे खंडन केलेले असते. सौ. बेनेट यांचा उथळपणा व एलिझाबेथच्या धाकट्या बहिणींचा बेजबाबदारपणा, स्वैरपणा व जेनचे चार्ल्सवर एव्हढे उत्कट प्रेम त्याला दिसत नाही - ही कारणे चार्ल्सला जेनपासून दूर ठेवण्यासाठी दिलेली असतात. तर विकहॅमबाबतीत त्याने खूप उदारपणा दाखवलेला असतो. त्याचा वाटा त्याला दिलेला असतोच. पण आणखी पैसे देऊन लष्करात त्याला कमिशन मिळवून दिलेले असते. या उलट विकहॅमने डार्सीच्या धाकट्या बहिणीला फूस लावून तिला घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केलेला असतो.
डार्सीच्या पत्रातील अहंकारी सूर एलिझाबेथला खटकतो, पण त्याच्या विधानांतील सत्यता तिला हळूहळू पटू लागते. डार्सीच्या समाजात तिच्या कुटुंबियांचे वागणे नक्कीच हलक्या प्रतीचे वाटणारे असते. व जेनच्या प्रेमात थंडपणा आहे हे तिला मान्य करावे लागते. आणि विकहॅमचा बेशरमीपणा तिलाही खटकतो. डार्सी गर्विष्ठ होता पण त्याचा अहंकार त्याच्या उच्चकुलीन घराण्याला व त्याच्या श्रीमंतीला काही अंशी साजेसा सयुक्तिक होता हे तिला पटते. आणि त्याच्या विरूद्धचा तिचा पूर्वग्रह कमकुवत होऊ लागतो. डार्सीला न भेटताच एलिझाबेथ हार्टफर्डला घरी परत येते.

पूर्वी मेरीटनला असलेली लष्करी अधिकाऱ्यांची पलटण आता ब्रिस्टलला आलेली असते. एका अधिकाऱ्याची पत्नी लिडियाला आग्रहाचे आमंत्रण देते. आणि लिडिया जाण्याचा हट्ट धरून बसते. एलिझाबेथचा विरोध असतानाही तिला परवानगी दिली जाते व ती जाते. त्याच वेळी श्री. व सौ. गार्डिनर एलिझाबेथला डर्बीशायर या निसर्गसमृद्ध परगण्याच्या सहलीसाठी आग्रहाचे आमंत्रण देतात. डार्सीची इस्टेट व हवेली त्याच भागात पेंबर्ली येथे असल्यामुळे एलिझाबेथला उत्सुकता वाटते व ती जाते. पेंबर्लीचे निवासस्थान नैसर्गिक सौंदर्य व मालकाची कलात्मक सजावट यामुळे खूपच आकर्षक झालेले होते. आपण या सुंदर मालमत्तेची मालकीण होऊ शकलो असतो हा विषादपूर्वक विचार तिथे हिंडताना तिच्या मनात डोकावून गेला. पेंबर्लीच्या व्यवस्थेसाठी ठेवलेल्या जुन्या वृद्ध

व्यवस्थापिकेने तर डार्सीबद्दल इतके कौतुकाचे गौरवोद्गार काढले की एलिझाबेथला त्या जागेबद्दल खूप प्रेम वाटू लागते. पेंबर्ली सोडतानाच अचानक समोरून डार्सी येतो व त्यांची भेट होते. डार्सी त्या सर्वांना अगत्याने आत बोलवतो. स्वतः त्यांच्या बरोबर येऊन हवेली दाखवतो. श्रीमंती व रसिकता यांचे मंत्रमुग्ध करणारे मिश्रण तो स्वतः उलगडून दाखवतो. या भेटीत त्याच्या वागण्यात नम्रता व आत्मीयता जाणवू लागते. तो एलिझाबेथला आपल्या बहिणीशी ओळख करून देण्याची परवानगी मागतो. त्याचे अगत्य सुखावणारे असते.

पेंबर्ली सोडण्याचा दिवस आला. एलिझाबेथला जेनचे पत्र मिळाले. त्यात एक धक्कादायक बातमी असते. ब्रिस्टलला गेलेल्या लिडियाला विकहॅम भेटला होता व ती त्याच्याबरोबर पळून गेली होती. सर्वांना धक्का बसतो. एलिझाबेथला ताबडतोब घरी बोलावलेले असते. एलिझाबेथच्या चेहऱ्यावरील चिंतेचे भाव पाहताच डार्सी चौकशी करतो व तिला परिस्थिती सांगणे भाग पडते. त्याच्या कपाळावरील आठ्या त्याची प्रतिक्रिया दाखवतात.

एलिझाबेथ दुसऱ्याच दिवशी पेंबर्ले सोडते व घरी येते. काही दिवस जातात. आणि बातमी येते - लिडिया व विकहॅम यांचा शोध लागलेला असतो. त्यांचा विवाह झालेला असतो. थोड्याच दिवसात लिडिया व विकहॅम घरी भेटण्यासाठी येतात. लिडियाला आपल्या वागण्याची जराही खंत वाटत नसते. उलट आपण सर्वात लहान असूनही आपले लग्न प्रथम झाले याचा तिला गौरव वाटत असतो. डार्सीने तिच्याबद्दल केलेले विधान किती बरोबर होते याची तिला परत एकदा पारख पटते. चार दिवसांनी लिडिया आपल्या नव्या घरी निघून जाते. लिडिया आपल्या लग्नाला डार्सी हजर होता असे विधान करते व एलिझाबेथला आश्चर्य वाटते. गार्डिनर मावशीकडून आणखी माहिती कळते. डार्सीनेच विकहॅमचे सर्व कर्ज फेडून त्याला लिडियाशी लग्न करायला भाग पाडलेले असते.

पुढल्याच थोड्या दिवसांत लेडी कॅथरीन बेनेट कुटुंबियांना आणि विशेषतः एलिझाबेथला भेटण्यासाठी एखादी धाड यावी तशा येतात. त्यांच्या बरोबर त्यांची कृश, फिकट कन्याही असते. त्यांना एलिझाबेथ डार्सीबरोबर लग्न करणार आहे अशी कुठूनतरी बातमी मिळालेली असते व 'ती डार्सीबरोबर लग्न करणार नाही' असे वचन तिच्याकडून घेण्यासाठी त्या आलेल्या असतात. डार्सीची आता आपणास लग्नाची मागणी येईल अशी सुतराम अपेक्षा नसतानाही एलिझाबेथ लेडी कॅथरीनला असे वचन देण्यास साफ नकार देते.

संतापलेल्या लेडी कॅथरीन थेट डार्सीकडे येतात व त्याला हा सगळा वृत्तांत सांगतात. तक्रारीच्या सुरात हे सारे वृत्त डार्सीला सांगितल्यानंतर त्याच्यावर अपेक्षेपेक्षा उलटाच परिणाम होतो. एलिझाबेथविरूद्ध त्याचे मन कलुषित होण्याएवजी आता ती पूर्वीइतकी आपल्यावर नाराज नाही हे त्याच्या लक्षात येते आणि तो थेट एलिझाबेथकडे येतो. तिला परत लग्नाची मागणी घालतो. एव्हाना गर्व मावळलेला असतो आणि कलुषित मन निर्मळ झालेले असते. एलिझाबेथ सहर्ष त्याच्या मागणीचा स्वीकार करते.

त्याच सुमारास चार्ल्स बिंग्ले परत नेदरफील्ड पार्क मधे राहावयास येतो. त्याचे व जेनचे प्रेम निर्विघ्नपणे बहरू लागते व थोड्याच दिवसांत दोघांचा वाङ्‌निश्चय होतो. त्यांच्या पाठोपाठ डार्सी व एलिझाबेथ यांचाही विवाह जाहीर होतो. एलिझाबेथचे डार्सीबद्दल अनुकूल मत नाही असा समज असल्यामुळे त्यांच्या विवाहाची बातमी ऐकून आश्चर्यचकित झालेल्या आपल्या वडलांना एलिझाबेथ म्हणते, "आम्ही अगदी सुखी जोडपे असणार आहोत (We are going to be the happiest couple)."  तीन मुलींची लग्ने इतक्या झटपट ठरल्यामुळे सौ. बेनेट अर्थातच एकदम खूष होतात.

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 020-25881194, 98811-49755
Email: joshi.bindumadhav@gmail.com